RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत




संपर्क
अँड . सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि. 23 मार्च 2026



1928- मुंबई भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद बडौदा नरेश सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न.
1929- बेळगाव येथे अस्पृश्यांच्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मार्गदर्शन.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

सोमवार, २३ मार्च २०२६ | वर्ष : ६ | अंक : ८४ | दैनिक | किंमत : ₹५/-
Monday, 23 March 2026 | Year : ६ | Issue : 84 | Daily | Rate: Rs. 5/-

### नागपूरात पहिल्या आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषदेत

# परिवर्तनाच्या प्रक्रियेला नवी ऊर्जा

**नागपूर :** नागपूर येथे पहिली आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद अत्यंत उत्साहपूर्ण आणि वातावरणात पार पडली. तथागत बुद्ध आणि भिख्खुणी संघाच्या स्थापनेला मूर्त रूप देणाऱ्या महाप्रजापती गौतमी यांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. निवृत्त सनदी अधिकारी मंगेश दहिवले यांनी लिखित कॉन्फरन्स गीताने कार्यक्रमाला प्रेरणादायी प्रारंभ मिळाला. हे गीत संघर्ष आणि अस्मितेचा सशक्त आवाज ठरले.
कार्यक्रमात यशोधरा, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. उद्घाटनपर भाषण आयआरएस कमिश्नर डॉ. पल्लवी दराडे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात शिक्षण, संविधान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले. 'सावित्रीबाई आणि जोतिबा हेच आमचे खरे मायबाप आहेत. संविधानामुळे महिलांना अधिकार मिळाले आणि विकासाचा मार्ग खुला झाला,' असे त्यांनी नमूद केले. तसेच 'प्रश्न सोडवण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब आवश्यक असून बुद्ध हे मनाचे सर्वोच्च शास्त्रज्ञ आहेत,' असे त्या म्हणाल्या.







'मुक्ती' प्रकल्पाच्या डायरेक्टर संघपाली अरुणा यांनी नागपूरमधील बौद्ध चळवळीची ताकद अधोरेखित करत महिलांनी स्वतःचा आवाज ओळखून स्वतःचा मार्ग निवडण्याचे आवाहन केले. 'स्त्रियांनी स्वतःचे स्थान निर्माण करून संघटित स्वातंत्र्यांकडे वाटचाल करावी,' असे त्यांनी सांगितले. प्रा. अंजली मयदेव आंबेडकर यांनी डॉ. आंबेडकरांच्या धम्मदीक्षेमुळे महाराष्ट्राला मिळालेल्या नव्या दिशेचा उल्लेख केला. भिख्खुणी संघ हा स्त्रियांसाठी मोठा वारसा असून त्या वारशाच्या आधारे पुढे जाण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.
अमेरिकेतील सांता फे येथील उपाया झेन सेंटरच्या रोशी जोन हैलीफॅक्स यांनी 'बौद्ध धम्म आणि स्त्रीवाद' या विषयावर आभासी माध्यमातून मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की बुद्धांच्या अनात्मवादाच्या सिद्धांतामुळे पाश्चात्य स्त्रीवादी बौद्ध धम्माकडे आकर्षित होत आहेत. बौद्ध धम्मामुळे स्त्रियांचा आवाज, अनुभव आणि अस्तित्व केंद्रस्थानी आले असून, हा मंच जागतिक महिलांचा आवाज बनावा, असे त्यांनी आवाहन केले. 'बुद्धाचा मार्ग केवळ व्यक्तिगत शांतीसाठी नसून सामाजिक न्यायाचा आणि धाडसी परिवर्तनाचा मार्ग आहे,' असे त्यांनी नमूद केले.
परिषदेदरम्यान 'साक्यधिता' स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची भूमिका आयोजक प्रा. मृणाल माधुरी मिलिंद दुपटे यांनी स्पष्ट केली.
यावेळी समाजातील उल्लेखनीय कार्यासाठी दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजुरकर, गोंदिया येथील सविता बेदरकर आणि कामठी येथील विमल आडे यांचा विशेष सत्कार केला. या सत्कार कार्यक्रमाचे निवेदन डॉ. दीप्ती किरतकर यांनी केले. तसेच आयोजन मंडळातील डॉ. दीप्ती किरतकर, प्रा. मृणाल माधुरी मिलिंद दुपटे आणि डॉ. जागृती मेश्राम गायकवाड यांचाही विशेष सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन नाट्य व सिने दिग्दर्शक व अभिनेत्री सांची वंदना संजय जीवने यांनी केले, तर आभार डॉ. जागृती मेश्राम यांनी मानले. या परिषदेला डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. एन.डी. पाटील, डॉ. शंकर खोब्रागडे, डॉ. त्रिशला ढेमरे, डॉ. स्मृती रामटेके, डॉ. तांबे, डॉ. संजय रामटेके यांसह अनेक मान्यवर, डॉक्टर्स आणि भिख्खुणी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# स्मृतिशेष प्रा. रणजित मेश्राम यांना सामूहिक आदरांजली

### प्रा. रणजित मेश्राम हे डॉ. बाबासाहेबांच्या सम्यक क्रांतीचे विज्ञान अन् पुढची दिशा देणार नेतृत्व : ताराचंद्र खांडेकर

**नागपूर :** समाज निर्मितीच्या प्रक्रि येमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सम्यक क्रांतीचे विज्ञान आणि पुढची दिशा देणारे कर्तृत्ववान नेतृत्व म्हणजे प्रा. रणजित मेश्राम होते. त्यांच्या निधनाने आंबेडकरांच्या सम्यक क्रांतीचे विज्ञान आणि पुढची दिशा देणारे समर्पण जाणिवेचा व्यक्ती हरपला, असे प्रतिपादन ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत ताराचंद्र खांडेकर यांनी केले. प्रा. रणजित मेश्राम यांचे गेल्या 4 मार्च 2026 रोजी निधन झाले. त्यानिमित्त आंबेडकरी चळवळीतील आणि पुरोगामी विचारांच्या विविध संघटनांच्यावतीने गठित प्रा. रणजित मेश्राम आदरांजली सभा संयोजन समितीतर्फे रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, कामठी रोड येथे आदरांजली सभा आयोजित केली होती. यावेळी स्मृतिशेष प्रा. रणजित मेश्राम यांच्या पत्नी डॉ. सविता मेश्राम आणि मुलगा प्रियदर्शन उपस्थित होते. खा. चंद्रकांत हांडोरे म्हणाले, प्रा. मेश्राम हे निर्भीड असे नेते व पत्रकार होते. ते केवळ डॉ. बाबासाहेबांचे विचारच सांगत नव्हते. तर प्रत्यक्षात तशी कृती व्हावी, यासाठी प्रयत्न करायचे. प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी, रणजित मेश्राम हे क्रांतीला उजागर करणारे नेतृत्व होते, अशी भावना व्यक्त केली. ॲड. फिरदोस मिर्झा यांनी, प्रा. मेश्राम यांच्या जाण्याने संविधानाप्रती समर्पित असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिगतरीत्या मोठे नुकसान झाल्याचे सांगितले. ज्येष्ठ पत्रकार भुपेंद्र गणवीर म्हणाले, वाणी आणि लेखणीच्या बळावर त्यांनी लोकांच्या मनात घर केले. ते समाजाची प्रेरणा होते. ॲड. सुलेखा कुंभारे, डॉ. मिलिंद माने, डॉ. राजेंद्र गवई, बहुजन विचारवंत नागेश चौधरी, माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, प्राचार्य बागडे यांनीही त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक बाळू घरडे यांनी केले. संचालन अशोक कोल्हटकर यांनी केले. दै. बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूरकर, परमानंद रामटेके, प्राचार्य सच्चिदानंद दारुंडे मुरली मेश्राम, तक्षशिला वाघधरे, बंडोपंत टेंभुर्णे, हंसराज मेश्राम, प्रा पुष्पा घोडके,निरंजन वासनिक, नरेश महाजन,अनिल वासनिक, भीमराव वैद्य आदी उपस्थित होते. प्रा. रणजित मेश्राम यांच्या एकूणच जीवनावर व विचारांवर एक स्मरणिका काढण्यात यावी, असे माजी मंत्री ॲड. सुलेखा कुंभारे यांनी सांगितले. तर त्यांच्या नावाने देशातील ज्वलंत मुद्यांवर व्याख्यानमाला आयोजित व्हावी, अशी अपेक्षा ॲड. फिरदोस मिर्झा आणि माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केली.

## महत्त्वाच्या बातम्या

### ट्रम्प यांचा होर्मुझवर 48 तासांचा अल्टिमेटम

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत इराणला 48 तासांचा अल्टिमेटम दिला असून, वीज प्रकल्पांवर हल्ले करण्याचा इशारा दिला आहे. इराण आणि इस्त्रायलमधील तणाव शिगेला पोहोचला असून, दिमोनासारख्या संवेदनशील ठिकाणांना लक्ष्य केल्याच्या वृत्तांमुळे परिस्थिती आणखी चिघळली आहे. दरम्यान, भारतातील हवामानाने अचानक वळण घेतले आहे. वादळ, पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे अनेक राज्यांमध्ये तापमानात मोठी घट झाली असून, राज्यव्यापी सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### इराणने इस्त्रायलच्या अणुतळांवर केला क्षेपणास्त्र हल्ला

**नवी दिल्ली :** इराणने रात्री उशिरा इस्त्रायलच्या दोन शहरांवर मोठा क्षेपणास्त्र हल्ला केला. दक्षिण इस्त्रायलमधील दिमोना शहरावर झालेल्या इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यात किमान 47 जण जखमी झाले. त्याच वेळी, दक्षिण इस्त्रायलमधील अराद शहरावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात 50 हून अधिक लोक जखमी झाले.

## मणिपूर हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर शांततेच्या आशा पल्लवित ...




**इम्फाळ :** मणिपूरमधून एक महत्त्वपूर्ण बातमी समोर आली आहे. गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या वांशिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री युमनाम खेमचंद सिंह यांनी शनिवारी संध्याकाळी गुवाहाटी येथे कुकी-झो कौन्सिलच्या शिष्टमंडळासोबत एक तासभर बैठक घेतली. या बंद दाराआड झालेल्या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा झाली. मे 2023 मध्ये उसळलेल्या हिंसाचारानंतर मणिपूर सरकारचे प्रमुख आणि कुकी-जी समुदायाचे सर्वोच्च नेतृत्व यांच्यातील ही पहिलीच समोरासमोरची भेट आहे. सुमारे सव्वादोन तास चाललेल्या या चर्चेमुळे अशांततेचा गोठलेला बर्फ वितळण्यास मदत झाली आहे. शांततेच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणून, कुकी समुदायाने रविवारी जारी केलेल्या एका निवेदनात याला दुजोरा दिला. परिषदेने याचे वर्णन औपचारिक संवादाची सुरुवात असे केले. तथापि, या बैठकीत कोणत्याही ठोस करारांवर स्वाक्षरी झाली नाही. असे असले तरी, मणिपूरच्या राजकारणावर बारकाईने लक्ष ठेवणाऱ्यांचा असा विश्वास आहे की, दोन्ही पक्षांचे एकत्र चर्चेसाठी बसणे हा स्वतःच एक मोठा राजनैतिक विजय आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर अनेक प्रमुख मागण्या मांडल्या. कुकी समुदायाच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले की, संघर्षात प्राण आणि मालमत्ता गमावलेल्या पीडितांना न्याय मिळणे ही कोणत्याही शांतता प्रक्रियेसाठी एक पूर्वअट आहे. शिवाय, कुकी नेत्यांनी सांगितले की कुकी आणि तांगखुल समुदायांमधील अलीकडील वाढलेल्या तणावावर तातडीने तोडगा काढणे आवश्यक आहे. अंतिम राजकीय तोडगा निघेपर्यंत, दोन्ही समुदायांमधील बफर झोनची सद्यस्थिती कायम ठेवली पाहिजे. या प्रदेशात चिरस्थायी शांतता सुनिश्चित करण्यासाठी दहशतवादी गटांसोबत सुरू असलेली कारवाई स्थगितीवरील चर्चा लवकरच तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचवली पाहिजे.

## आम्ही आधी स्वयंसेवक मग मंत्री : चंद्रकांत पाटील



**पुणे :** 'संघ काही करणार नाही सर्व होणार आहे,' या तत्त्वानुसार ही महाराष्ट्र साहित्य परिषदेची निवडणूक जिंकण्यात यश मिळाले. तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी संघ या निवडणुकीत उतरला असून संघाचे काय काम? असा प्रचार सुरू केला. पण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे रसायन काय आहे याची कल्पनाच सत्ताधाऱ्यांना नव्हती. या रचनेत देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील हे आधी स्वयंसेवक मग मुख्यमंत्री किंवा शिक्षणमंत्री असतात,' अशी भूमिका उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी मांडली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीमध्ये विजयी झालेल्या साहित्य संवर्धन आघाडीच्या विजयी उमेदवारांच्या स्नेहमेळाव्यात चंद्रकांत पाटील बोलत होते. त्यांच्या हस्ते महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, स्थानिक कार्यवाह सुनील महाजन, सुनेत्रा मंकणी, प्रसाद मिरासदार, डॉ. नितीन संगमनेरकर यांचा सत्कार करण्यात आला. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे आणि प्रसिद्ध अभिनेते-दिग्दर्शक प्रवीण तरडे या वेळी उपस्थित होते. 'निवडणूक संपली त्याला आठवडा होऊन गेला. आता आपण ही निवडणूक कशी जिंकली याची चर्चा करणे बंद करा. ज्या कारणासाठी जिंकलो त्याचा आराखडा तयार करून त्याची कार्यवाही करावी.

## तुरुंग खचाखच का भरले आहेत? सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली :** देशातील तुरुंगांमधील कैद्यांच्या नरकयातनादायक परिस्थितीबाबत सर्वोच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने एक महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना 18 मे पर्यंत त्यांच्या तुरुंगांचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, म्हणजेच न्यायालयाने सर्व राज्यांकडून प्रत्येक पैशाचा हिशोब मागितला आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की जुनी आकडेवारी यापुढे पुरेशी ठरणार नाही. राज्यांनी 1 मार्च 2026 रोजीच्या परिस्थितीनुसार, त्यांच्या तुरुंगांमधील कैद्यांची एकूण संख्या जाहीर करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, राज्यांनी ते किती कैद्यांना ठेवू शकतात आणि सध्या त्यांच्या ताब्यात असलेल्या कैद्यांची संख्या देखील जाहीर करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना केवळ आकडेवारीच नव्हे, तर उपाययोजनाही विचारल्या आहेत. तुरुंगांमधील गर्दी कमी करण्यासाठी प्रशासनाने आतापर्यंत कोणती ठोस पावले उचलली आहेत, हेही न्यायालयाने विचारले आहे. न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून तुरुंगनिहाय आकडेवारी मागवली आहे. यातून कोणत्या तुरुंगांची परिस्थिती सर्वात वाईट आहे, हे उघड होईल. याशिवाय, आपल्या कैदी मातांसोबत तुरुंगात राहण्यास भाग पडलेल्या मुलांच्या भविष्यासाठी आणि शिक्षणासाठी काय व्यवस्था करण्यात आली आहे? न्यायालयाने म्हटले आहे की, या मुलांचे आरोग्य, पोषण आणि शिक्षण कोणत्याही परिस्थितीत प्रभावित होऊ नये.



# दीक्षाभूमीचा परिसर शनिवारी संध्याकाळी आंदोलनाच्या जोशपूर्ण गीतांनी गजबजला





**नागपूर :** हजारो आंबेडकरी अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते, महिलांचा मोठा जमाव आणि उत्साही तरुण-तरुणींनी मैदान भरून गेले होते. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग आणि नागपुर बुद्धिस्ट एसोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने संविधानाच्या 75 वर्ष पूर्ती आणि महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या 99 वर्ष पूर्तीनिमित्त हा समारोह आयोजित करण्यात आला होता. दीक्षाभूमिवर लोकप्रिय लोकगायिका गिन्नी माही यांनी मंच सांभाळला आणि आपल्या धमालदार गीतांनी संपूर्ण वातावरण तापवून टाकले. गिन्नी माहींच्या गळ्यातून निघालेल्या 'फॅन बाबा साहिब दी', 'डेंजर चमार', 'बोलो जय भीम', 'प्रणाम बाबासाहेब...', अगर भीम जी इस दुनिया में आते ना... आणि इतर हिट गीतांनी श्रोत्यांना भावुक करून टाकले. पंजाबी, हिंदी आणि मराठी भाषेत एकापेक्षा एक सरस गाणी म्हणत गिनी माही यांनी श्रोत्यांना एक वेगळ्याच विश्वात नेले. काही ज्येष्ठ नागरिक तर डोळ्यात पाणी आणून 'डॉ. बाबासाहेब तुमच्या आशीर्वादाने आम्ही इथवर पोहोचलो' असे म्हणत होते, तर तरुण-तरुणी नाचत, हात उंचावून ताल देत होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सांस्कृतिक राज्यमंत्री ॲड. आशीष जैस्वाल यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य डॉ. चंद्रशेखर मेश्राम, प्रसाद कुळकर्णी, अमन कांबळे यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. हा कार्यक्रम फक्त सांस्कृतिक नव्हता, तर इतिहासाच्या पानांवरून प्रेरणा घेणारा होता. 1927 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात महाड (रायगड) येथे चवदार तळ्यावर दलितांनी पाणी पिण्याचा हक्क मागितला होता. मनुवादी व्यवस्थेविरुद्ध हा पहिला मोठा सत्याग्रह होता, ज्याने नंतर संपूर्ण देशाला सामाजिक न्यायाच्या लढ्याला दिशा दिली. गिनी माही यांना 'भीमराज की बेटी' म्हणूनही ओळखले जाते. त्यांनी मराठीत 'जय भीम' गावून प्रथमच श्रोत्यांना आश्चर्यचकित केले. ÷बाबासाहेबांच्या अभिवादनासाठी गायलेल्या 'प्रणाम बाबासाहेब...' या गाण्याने तर सगळ्यांचे हृदय जिंकले. यानंतर 'आते ना... यानंतर बन के मसीहा आया कोम का... भीमा तेरी' या ओळींनी संपूर्ण मैदान एकत्र आले, दीक्षाभूमीवर शनिवारी रात्रीचा हा जलसा केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर लाखो आंबेडकरी अनुयायांसाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारा सोहळा ठरला.

रजि. नं. महाराष्ट्र नाग. ८०२/२०१८ व ३६४७७/२०१९

## बुध्द विहार समन्वय समिती

व्दारा संचालित

### बुध्दीस्ट हेरीटेज ॲण्ड कल्चर कन्झर्वेशन कमिटी

आयोजित

पवनी लेणी व उत्खनन, शांतिवन बुध्द विहार चिंचाड, गोसेखुर्द धरण, महास्तुप व बुद्ध विहार सिंदपुरी, गोठनगांव दर्शन व धम्म अभ्यास सहल
(टिप : डॉ. मधूकर कठाने, पुरातत्व शास्त्रज्ञ यांच्या सहवासात )



**दिनांक २९/३/२०२६ रविवार सकाळी ६ वा. ते रात्री ९ वाजेपर्यंत**
नाश्ता चहा व दुपारच्या जेवणासह लक्झरी बस ने
देणगी शुल्क रु. ९००/- प्रति व्यक्ती ● ५ वर्षाच्या मुलांना निशुल्क

**बुकिंग साठी अंतीम दिनांक २५/३/२०२६**
देणगी शुल्क QR कोड नी टाकणे अनिवार्य शुल्क जमा केल्याचा स्क्रीन शॉट पाठवावा ज्यांना तसें जमत नाही त्यांनी दुसऱ्या व्यक्तीकडून करवून घेणे, सोबत पाणी बाटली खाद्य पदार्थ टोपी गमछा ठेवावा. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करावे.

Bank of India
BUDDHA VIHAR SAMANVAY SAMITI PALI BHASHA
SCAN & PAY
boim-874001501414@boi
रक्कम भरल्यानंतर Screen Shot पाठवावा

**धम्म सहलीला येणाऱ्या प्रवाश्यांसाठी सूचना**
- मधुमेही प्रवाशांनी आपल्या सोबत औषधी व खाद्य पदार्थ ठेवावे.
- प्रत्येक स्पॉट वरील वेळ हे प्रवाशांच्या सहकार्यावर व बसवर अवलंबुन राहील.
- सहलीची देणगी रक्कम मिळाल्या शिवाय प्रवेश निश्चित होणार नाही. ● सोबत आधारकार्ड आणावे.
- सहकार्याची भावना असलेल्या प्रवाशांनीच या सहलीला यावे.

**● संपर्कासाठी क्षेत्रानुसार प्रतिनिधी ●**
सुगत नगर :- कांताप्रसाद रामटेके मो. ८०५५३८३८०७ वैशाली नगर :- एम.व्ही. नाईक मो. ९४२२८१८८७३ सोनेगाव :- गौतम मोडक मो. ९४२३६३४९८४, डॉ. प्रमिला सरस्वती मो. ८७८८६०७३२३ अग्ने ले-आऊट :- हीरामण वाघमारे मो. ९८९०१८१८३४, स्नेहल पाटील मो. ८४५९७३६८८६ मानेवाडा :- अशोक झामरे मो. ९७६३८२०८६७ पांडे ले-आऊट :- पेनुलता बोम्बर्डे मो. ९५६१५०१७८८ सदभावना नगर :- उत्तम मेश्राम मो. ७७०९७१४२११ बेलतरोडी :- सिध्दार्थ खोब्रागडे मो. ९४२३१२२३७५ सदर :- अरविंद नगरकर मो. ९९६०२३००२३ गोपाल नगर :- दिलीप बागडे मो. ८३०८००१२१४ कर्नलबाग :- मायाताई जामगडे मो. ९३७१५९२७३५ वाडी :- सिध्दार्थ लोखंडे मो. ८६५७९७६७९० नरेंद्र नगर :- व्ही.पी. वाघमारे मो. ९४२३६८०१५०, देवांगीनी कांबळे मो.९७६६९१६६१० हिरवीनगर :- विश्वनाथ लोखंडे मो. ८७८८२६१९४७ सुरेंद्र नगर :- प्रा. घनश्याम धावडे मो. ९९७००७१५५० विवेकानंद नगर :-अनिल गौतम मो. ८८३०८०४७७० हजारी पहाड :- नरेश मेश्राम मो. ९४२३४०४८६१
महिला प्रतिनिधी:- सुचिता बुरबुरे मो.८४५९२५४९४०, प्रमिला सोनवणे मो. ८६६८७१२०२३ तनुजा झीलपे मो.८६००३५०८३८ सुविता लोखंडे मो. ७८४१९३८२७८ तारा गजभिये मो. ९३७३३५०३२३ गोपिकाताई खोब्रागडे मो.९४२३३०९३२८ प्रमिला चिंचखेडे मो. ८७८८६०७३२३ माधुरी लोखंडे मो. ७७०९००३८३४

अधिक माहिती साठी संपर्क : ईजि. ए.के. पाटील -7972987584 प्रा.आनंद वासनिक -9822238757

# दिशा नेहमी मानवी बुद्धिमत्तेनेच ठरवली पाहिजे : सरन्यायाधीश

**बंगलोर :** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी न्यायप्रक्रियेतील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भूमिकेवर भर दिला आहे. ते म्हणाले की, न्यायव्यवस्थेत AI चा अवलंब अशा प्रकारे केला पाहिजे की, त्यामुळे संस्था अधिक मजबूत होईल, परंतु निर्णय आणि मुख्य कार्यांमध्ये कोणताही हस्तक्षेप होणार नाही. ते म्हणाले की, AI मोठ्या प्रमाणातील डेटा आणि नोंदी हाताळण्यास, नमुने ओळखण्यास आणि प्रक्रियांमधील विलंब कमी करण्यास मदत करू शकते. सरन्यायाधीशांनी शनिवारी कर्नाटकातील न्यायिक अकादमीमध्ये आयोजित 'कृत्रिम बुद्धिमत्ता - विवादांचे प्रतिबंध आणि निराकरण' या विषयावरील दिवसभराच्या परिसंवादात हे विधान केले. बार असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रशांत कुमार यांनी स्पष्ट केले की, एआयमुळे

6 एआयने केवळ एक साधन किंवा मार्ग म्हणून काम केले पाहिजे, दिशा नेहमी मानवी बुद्धिमत्तेनेच ठरवली पाहिजे. आम्ही तुम्हाला सांगतो की, या परिसंवादात कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश विभू बखरू यांनीही एआयच्या वाढत्या भूमिकेवर चिंता व्यक्त केली होती. एआयने केवळ न्यायालयीन निर्णयांमध्ये मदत केली पाहिजे किंवा न्यायाधीशांची भूमिका कमी केली पाहिजे. न्यायमूर्ती बखरू म्हणाले की, एआयच्या माध्यमातून खटल्याचे भाकीत करणे आणि ऑनलाइन विवाद निराकरण अधिक जलद आणि किफायतशीर होऊ शकते, परंतु न्यायालयीन स्वातंत्र्य, पारदर्शकता आणि कायदेशीर नियम सर्वोच्च राहिले पाहिजेत.



न्यायालयाच्या निकालांचे स्थानिक भाषांमध्ये वेगाने भाषांतर करणे शक्य झाले आहे, ज्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना अधिक सहजपणे न्याय मिळवणे शक्य झाले आहे आणि वकिलांना त्यांच्या पक्षकारांशी संवाद साधण्यास मदत झाली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, हा परिसंवाद यूआयए इंडिया चॅप्टर, बार असोसिएशन ऑफ इंडिया आणि नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

### सध्या कॉलेजियम सर्वोत्तम आहे, सरकारने आपली जबाबदारी ओळखावी : माजी सरन्यायाधीश गवई



**बेंगळुरू :** अलीकडच्या काळात, न्यायपालिका आणि कार्यकारी मंडळ यांच्यात नियुक्तीच्या मुद्द्यावरून बराच तणाव निर्माण झाला आहे. माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी आता या विषयावर एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. बंगळूरू येथे सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनच्या पहिल्या राष्ट्रीय परिषदेत बोलताना न्यायमूर्ती गवई म्हणाले की, कॉलेजियम प्रणाली कदाचित परिपूर्ण नसेल, परंतु सध्याच्या परिस्थितीत न्यायपालिकेचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी ती सर्वोत्तम आहे. 'ही प्रणाली परिपूर्ण नाही, पण ती सर्वोत्तम आहे,'असे माजी सरन्यायाधीश म्हणाले. 'मी असे म्हणणार नाही की कॉलेजियम प्रणाली ही एक निर्दोष प्रणाली आहे. जगातील कोणतीही प्रणाली पूर्णपणे परिपूर्ण असू शकत नाही. प्रत्येक प्रणालीचे स्वतःचे फायदे आणि तोटे असतात. पण इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर मी या निष्कर्षावर आलो आहे की, सध्या भारतासाठी ही प्रणाली सर्वोत्तम आहे.'





बहुजन सौरभ

## संपादकीय

# बौद्ध महिला चळवळीचा निर्णायक टप्पा

नागपूर येथे पार पडलेली आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद 2026 हे केवळ एक शैक्षणिक वा धार्मिक कार्यक्रम नव्हते, तर ते सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने उचललेले एक ठोस आणि ऐतिहासिक पाऊल होते. बौद्ध धम्म, स्त्री कर्तृत्व आणि समकालीन समाजातील महिलांची भूमिका या त्रिसूत्रीवर आधारित या परिषदेने विचारांची नवी दिशा दिली आणि स्त्री सशक्तीकरणाच्या चळवळीला जागतिक परिमाण प्राप्त करून दिले. त्यामुळे ही परिषद केवळ यशस्वी आयोजन म्हणून मर्यादित न राहता, एक वैचारिक क्रांतीचे प्रतीक ठरली आहे. या परिषदेत बौद्ध थम्मात स्त्रियांच्या भूमिकेचा सखोल आढावा घेताना, इतिहास आणि वर्तमान यांच्यातील दुवा प्रभावीपणे उलगडण्यात आला. गौतम बुद्धांनी स्त्रियांना संघात स्थान देऊन जे क्रांतिकारी पाऊल उचलले, त्याचा परिणाम आजच्या स्त्री सशक्तीकरणाच्या विचारसरणीत स्पष्टपणे दिसून येतो. प्रारंभिक बौद्ध काळातील भिक्षुणी संघाची स्थापना ही स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने टाकलेली ऐतिहासिक पायरी होती. या परंपरेचा वारसा आजच्या काळात महिलांनी विविध क्षेत्रांत नेतृत्व स्वीकारून पुढे नेला आहे, याचे सशक्त चित्र या परिषदेत दिसून आले. परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या विविध पॅनेल चर्चांनी या विषयाला अधिक व्यापक आणि सखोल स्वरूप दिले. 'प्रारंभिक बौद्ध धर्मातील महिलांची भूमिका', 'संघातील महिलांचे स्थान आणि अधिकार', 'आधुनिक बौद्ध समाजातील स्त्रियांचे नेतृत्व' आणि 'जागतिक पातळीवरील बौद्ध महिलांचे योगदान' या विषयांवर विद्वानांनी मांडलेले विचार अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी होते. या चर्चांमधून एक गोष्ट प्रकर्षाने पुढे आली की, महिलांनी केवळ धर्माचे पालन करणाऱ्या अनुयायी म्हणून नव्हे, तर विचारांची निर्मिती करणाऱ्या आणि समाजाला दिशा देणाऱ्या नेतृत्वाच्या भूमिकेतही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या परिषदेतून एक महत्त्वाचा संदेश अधोरेखित झाला तो म्हणजे, बौद्ध धर्मातील समता, करुणा आणि प्रज्ञा या मूल्यांची आजच्या सामाजिक जीवनात प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. महिलांना शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णय प्रक्रियेत समान सहभाग मिळाल्याशिवाय खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यामुळे ही परिषद केवळ विचार मांडण्यापुरती मर्यादित न राहता, प्रत्यक्ष कृतीसाठी मार्गदर्शक ठरली आहे. विशेष म्हणजे, या परिषदेत विविध देशांतील विद्वान, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला नेत्यांचा सहभाग होता. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण जागतिक पातळीवर झाली आणि विविध सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमीतील अनुभव एकत्र आले. या संवादातून महिलांच्या सशक्तीकरणासाठी नवीन धोरणे, उपक्रम आणि सहकार्याच्या संधी निर्माण झाल्या. ही बाब या परिषदेला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक महत्त्वपूर्ण बनवते. आजच्या काळात स्त्रियांच्या सशक्तीकरणाचा प्रश्न केवळ सामाजिक नव्हे, तर आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय स्तरावरही महत्त्वाचा ठरतो. अनेक ठिकाणी अजूनही महिलांना समान संधी मिळत नाहीत, त्यांच्यावर अन्याय आणि भेदभाव होत आहे. अशा परिस्थितीत, बौद्ध विचारसरणीच्या आधारे समतेचा आणि न्यायाचा संदेश देणारी ही परिषद अत्यंत समर्पक आणि आवश्यक होती. नागपूरसारख्या ऐतिहासिक आणि बौद्ध चळवळीच्या केंद्रस्थानी ही परिषद आयोजित होणे हेही विशेष महत्त्वाचे आहे. या परिषदेतून महिलांच्या नेतृत्वाची गरज अधोरेखित झाली. समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत महिलांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे, हे सर्वांनी मान्य केले. महिलांनी केवळ कुटुंबापुरती मर्यादित न राहता, समाजाच्या सर्व क्षेत्रांत पुढे यावे आणि नेतृत्व स्वीकारावे, असा संदेश या परिषदेतून देण्यात आला. यामुळे नव्या पिढीतील महिलांना प्रेरणा मिळेल आणि त्या आत्मविश्वासाने पुढे येतील, अशी अपेक्षा आहे. परिषदेत मांडण्यात आलेल्या विचारांमुळे बौद्ध धम्मात एक आधुनिक आणि प्रगतिशील चेहरा समोर आला. समता, अहिंसा, करुणा आणि विवेक या मूल्यांच्या आधारे समाजात सकारात्मक बदल घडवून आणता येतो, यावर या परिषदेनं शिक्कामोर्तब केले. त्यामुळे ही परिषद केवळ बौद्ध समाजापुरती मर्यादित न राहता, संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक ठरते. अखेर, आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद 2026 ही परिषद एक ऐतिहासिक आणि यशस्वी घटना म्हणून ओळखली जाईल. पण तिचे खरे यश हे त्या परिषदेतून निर्माण झालेल्या विचारांमध्ये, प्रेरणेत आणि कृतीच्या दिशेत आहे. या परिषदेनं महिलांच्या सशक्तीकरणासाठी नवा मार्ग दाखवला आहे आणि समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला नवी ऊर्जा दिली आहे. आता गरज आहे ती या विचारांना प्रत्यक्षात उतरवण्याची. महिलांना समान संधी देणे, त्यांचे नेतृत्व विकसित करणे आणि बौद्ध मूल्यांच्या आधारे समाज घडवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. या परिषदेतून मिळालेली प्रेरणा आणि दिशा यांचा उपयोग करून आपण अधिक न्याय्य, समताधिष्ठित आणि सशक्त समाज निर्माण करू शकतो. हीच या यशस्वी परिषदेची खरी फलश्रुती ठरेल. ■ ■

# मागासवर्गीय' शब्द वगळण्याचा निर्णय प्रेरणा आणि सामाजिक परिवर्तनाचे पाऊल!

**महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने राज्यातील शासकीय वसतिगृहांच्या नावातून 'मागासवर्गीय' हा शब्द वगळण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह, प्रगतिशील आणि सामाजिक दृष्ट्या परिवर्तनवादी आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या मनात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि सकारात्मक ओळख निर्माण होण्यास मदत होणार आहे.**




समाजातील उपेक्षित व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या संस्थांना सकारात्मक ओळख देण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानावे लागेल. राज्यात विभागांतर्गत सध्या एकूण 449 शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी 231 मुलांची आणि 218 मुलींची वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांमध्ये एकूण 46,673 विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामध्ये 24,958 मुलांची आणि 21,715 मुलींची प्रवेश क्षमता आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अनुकूल वातावरण मिळावे या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ निवासाची सोयच उपलब्ध करून दिली जात नाही, तर त्यांना नाश्ता, दोन वेळचे जेवण, निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश, वैद्यकीय साहित्य, मुलींसाठी स्वच्छता भत्ता, रेनकोट, गमबूट, क्रीडा साहित्य, शैक्षणिक सहली, कार्यशाळा तसेच टीव्ही, ॲक्वागार्ड, वॉटर कुलर आणि फायर फायटिंग यांसारख्या सुविधा पुरविण्यात येतात. त्यामुळे ग्रामीण व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेले वातावरण आणि आधार मिळतो. मात्र, या वसतिगृहांच्या नावांमध्ये 'मागासवर्गीय' हा शब्द वापरला गेल्यामुळे समाजातील उपेक्षित आणि शोषित घटकांकडे निर्देश होत राहतो आणि त्यातून एक प्रकारची सामाजिक विषमता अधोरेखित होते. संस्थांची ओळखही एका विशिष्ट घटकापुरती मर्यादित राहते. परिणामी विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर वसतिगृहांच्या नावातून हा शब्द वगळून त्यांना महापुरुषांची नावे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ही अत्यंत दूरदृष्टीची बाब आहे. विशेषतः वसतिगृहांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सावित्रीबाई फुले यांसारख्या महान समाजसुधारकांची नावे देण्यात आली, तर ते विद्यार्थ्यांसाठी केवळ औपचारिक नामकरण राहणार नाही, तर ते आदर्श, प्रेरणा आणि सामाजिक मूल्यांचे प्रतीक ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला मुक्तीचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांनी वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून स्वाभिमानाने उभे राहण्याचा मार्ग दाखविला. दुसरीकडे सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया रचून भारतीय समाजात मोठी क्रांती घडवून आणली. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध लढा देत शिक्षणाचा दीप प्रज्वलित ठेवला. म्हणूनच या महापुरुषांच्या नावाने वसतिगृहे असणे म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांची आणि कार्याची सातत्याने प्रेरणा मिळणे होय. विद्यार्थ्यांमध्ये समता, स्वाभिमान, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाची जाणीव दृढ करण्यासाठी हे प्रभावी माध्यम ठरू शकते. तसेच ही कृती म्हणजे समाजाने या महान समाजसुधारकांप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी घेतलेला हा निर्णय धाडसी आणि सामाजिक जाणीव असलेला आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंड दूर करून त्यांच्यात स्वाभिमान जागविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे मंत्री संजय शिरसाठ यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! त्यांच्या या निर्णयातून सामाजिक समता आणि स्वाभिमानाचा विचार स्पष्टपणे दिसून येतो. याच अनुषंगाने राज्यातील अनेक संस्था, बँका, शाळा व इतर ठिकाणीही 'मागासवर्गीय' असा उल्लेख फलकांवर करण्यात आलेला दिसतो. त्या ठिकाणीही हा शब्द वापरण्याची गरज नाही. त्यामुळे अशा सर्व संस्थांच्या नावांमधूनही हा शब्द वगळण्याबाबत शासनाने व्यापक धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाने पुढाकार घेतल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. उदाहरण म्हणजे वर्धा येथे महात्मा गांधी यांच्या पुढाकाराने हरिजन वसतिगृह स्थापन करण्यात आले. अनेक विद्यार्थी तेथे शिक्षण घेऊन पुढे आले. आता या वसतिगृहाचे नाव नवजीवन छात्रालय करण्यात आले. खाजगी संस्था सुद्धा नावात सुधारणा करू शकतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दूरदृष्टी ठेवून त्यांच्या संभाजीनगरच्या महाविद्यालयास मिलिंद महाविद्यालय. परिसरास नागसेन वन आणि मुंबईच्या महाविद्यालयास सिद्धार्थ महाविद्यालय असे नाव दिले. यातून बौद्ध राजा मिलिंद आणि भंते नागसेन तसेच सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा विद्यार्थ्यांपुढे आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाजात स्वाभिमान, समानता आणि सकारात्मक ओळख निर्माण करण्यासाठी अशा प्रकारचे निर्णय अत्यंत आवश्यक आहेत. वसतिगृहांच्या नावातून 'मागासवर्गीय' हा शब्द वगळून महापुरुषांची नावे देण्याचा निर्णय हा केवळ प्रशासकीय बदल नसून तो सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या मनात प्रेरणा निर्माण करणारा, समाजात समतेची जाणीव बळकट करणारा आणि महापुरुषांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा ठरेल, यात शंका नाही. आपण ज्या वसतिगृहात राहतो, त्या वसतिगृहाचे नाव विद्यार्थ्यांना गर्वाने आणि अभिमानाने उच्चारता येईल असे असणे आवश्यक आहे. त्या नावातून प्रेरणा, स्वाभिमान आणि आदर्शाची जाणीव निर्माण झाली पाहिजे. महापुरुषांच्या नावाने वसतिगृहे असल्यास विद्यार्थ्यांना त्या महान व्यक्तींच्या विचारांची प्रेरणा मिळते आणि ते नाव आपले भूषण आहे, अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होते. त्यामुळे वसतिगृहाचे नाव हे विद्यार्थ्यांसाठी केवळ ओळख नसून गौरव आणि प्रेरणेचे प्रतीक ठरले पाहिजे. त्या मुळे सामाजिक न्यायमंत्री मा संजय शिरसाठ यांच्या निर्णयाचे स्वागत आहे. ■ ■



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

# चवदार तळे - पाण्याचा सत्याग्रह - सामाजिक क्रांतीचे शताब्दी वर्ष

**चवदार तळे सत्याग्रह : पाण्यासाठीचा जगातील पहिला सत्याग्रह. हा केवळ पाणी पिण्यासाठी नव्हे तर मानवाच्या मूलभूत हक्कासाठीचा लढा होता. मानवी प्रतिष्ठेसाठी होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेला हा क्रांतिकारी व ऐतिहासिक लढा होता. आम्ही ही इतरासारखी माणसं आहोत हे सांगण्यासाठी होता. अस्पृश्यता नष्ट करण्याचा, चेतना निर्माण करणारा एक सामाजिक क्रांतीचा लढा होता. भेदभाव, विषमता संपविणाऱ्या लढ्याची सुरुवात येथूनच झाली. माणुसकीचे हक्क नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध हा लढा, स्वाभिमान जागविणारा होता. या लढ्यात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांची बीजे रोवली गेली आणि भारताचे संविधान तयार झाले.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्वात झालेल्या या सत्याग्रहामुळे कोट्यवधी लोकांना माणुसकीचे, प्रतिष्ठेचे जगणे प्राप्त झाले. सर्वसामान्यांच्या कल्याणाचे, विकासाचे, संरक्षणाचे, समता व न्यायाचे, स्वातंत्र्य व बंधुतेचे संविधान आले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कष्टामुळे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना त्यांनी दिलेला संदेश लेटर अँड स्पिरिट मध्ये अनुकरण करणे आपले कर्तव्य आहे. संविधानाने निर्माण केलेल्या व्यवस्थेत कार्यरत असलेले सगळेच संविधानाचे लाभार्थी आहेत. या सर्वांनी संविधानाची बेइमानी करू नये. म्हणजे, भ्रष्टाचार करू नये, शोषण/ पिळवणूक करू नये, जनतेशी सन्मानाने वागावे, संविधानिक मूल्यांशी खेळ खंडोबा करू नये. समाजातील सर्वसामान्य, शोषित, वंचित, दुर्बल, गरीब व गरजू लोकांसाठी इमानदारीने कर्तव्य व जबाबदारी पार पाडावी. भ्रष्ट, जातीयवादी, धर्मांध, अनैतिक राजकीय नेत्यांची, प्रभावशाली लोकांची गुलामी पत्करू नये, लाचारीने वागू नये, भ्रष्ट व्यवहार करू नये. वाईट करणार नाही, चांगलेच करणार, स्वाभिमान जपणार आणि सामाजिक दायित्वाचे काम सदैव करणार हाच निर्धार व्यक्त करणारा, 'बाबासाहेब' यांचे संदेशा नुसार वर्तनाचा संकल्प करण्याचा व दैनंदिन जीवनात आचरण करण्याची प्रेरणा हा दिवस देतो सरकारचे केवळ इव्हेंट नको, संविधानानुसार लेटर अँड स्पिरिट मध्ये अनुकरण व वर्तन आवश्यक आहे. सत्तेला प्रश्न विचारण्याची शक्ती या सत्याग्रहाच्या लढ्यातून मिळते. आज शोषित वंचित समाजापुढे जे प्रश्न आहेत ते सत्तेतील लोकांनी निर्माण केले आहेत. जन सुरक्षा कायदा, अनुसूचित जातीचे



उपवार्गीकरण, धर्मस्वातंत्र कायदा हेच दर्शविते. बजेट चा हक्काचा वाटा मिळण्याऐवजी वाट लावली जात आहे. आरक्षण संपविले जात आहे, atrocity कायद्याची अंमलबजावणी नीट होत नाही. सामाजिक व आर्थिक न्याय करणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. शोषित वंचित समाजासाठी सरकारने जे करायला पाहिजे ते होत नाही. आजही अनुसूचित जाती/ जमाती मधील मांग गारुडी, गोंड, तसेच भटके विमुक्त, मुस्लिम मदारी यांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यात खूप अडचणी आहेत. याकडे सरकारने प्रशासनाने लक्ष द्यावे. या समाज घटकांच्या वस्तीत मूलभूत सुविधा नाही, शुद्ध पिण्याचे पाणी मिळत नाही. व्यवस्थेत भ्रष्टाचार प्रचंड वाढत चालला आहे. अत्याचार, अन्याय व शोषण वाढत चालले आहे. यास मुख्यतः जबादार व्यवस्था आहे. तेव्हा व्यवस्था परिवर्तनाचे काम, व्यवस्थेतील व व्यवस्थेबाहेरील लोकांना समन्वयाने करावे लागेल. परंतु , या प्रश्नांवर संवाद होत नाही. संविधानाचे अनेक लाभार्थी जे व्यवस्थेत आहेत ते सुद्धा भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून शोषण व्यवस्था मजबूत करताना दिसतात. डॉ. बाबासाहेब यांचे नावाचा जयघोष करणारे नेते व अधिकारी सुद्धा यात सामील होतात हे डॉ. बाबासाहेब यांचेशी बेइमानी ठरते. स्वाभिमान जागृत करून विरोध करण्याची गरज आहे, नावाला साजेसे सामाजिक न्याय करण्याची गरज आहे. व्यवस्थेतील लोकांनी संविधानिक नीतिमत्तेचे वर्तन केले नाही तर अत्याचारी व्यवस्था मजबूत होऊन, देशाच्या स्वातंत्र्य ला, लोकशाहीला धोका निर्माण करणार. 20 मार्च 1927 ला महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक क्रांती साठी लढा लढला. हा समतेचा संगर आहे. संविधानाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी संविधानाचा जागर करण्याची गरज आहे. आम्ही सगळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाशी, त्यांचे विचारांशी एकनिष्ठ राहून, प्रामाणिक राहून आणि परिवर्तन घडवून आणण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहोत, पुन्हा हाच आमचा सम्यक संकल्प मजबूतीने पूर्णत्वास नेऊ या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन आणि या दिनाच्या सर्व नागरिकांना शुभेच्छा... ■ ■

माझे मत



इ झेड खोब्रागडे
9923756900

# इराण-अमेरिका-इस्त्रायल संघर्ष : प्रा. जियांग यांच्या भाकितांकडे जगाचे लक्ष

## बदलत्या जागतिक राजकारणातील संभाव्य धोक्याचा इशारा!




**आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडी अनेकदा अनपेक्षित वळण घेत असतात. कधी कधी काही विद्वानांनी केलेली भाकिते पुढील काळात अत्यंत महत्त्वाची ठरतात. सध्या अशाच एका भाकितामुळे जगभर चर्चा रंगू लागली आहे. चीनमधील इतिहास अभ्यासक Jiang Xueqin यांनी काही वर्षांपूर्वी केलेल्या तीन भाकितांकडे आज पुन्हा एकदा जागतिक समुदायाचे लक्ष वेधले जात आहे.**

प्रा. जियांग यांनी केलेले पहिले भाकित अमेरिकेच्या राजकारणाशी संबंधित आहे. त्यांच्या मते अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष Donald Trump पुन्हा एकदा सत्तेच्या केंद्रस्थानी येऊ शकतात. अमेरिकेतील वाढते राजकीय ध्रुवीकरण, बदलते जनमत आणि ट्रम्प यांचा अद्याप टिकून असलेला प्रभाव पाहता हे भाकित अनेक राजकीय विश्लेषकांच्या चर्चेचा विषय ठरले आहे. प्रा. जियांग यांचे दुसरे भाकित मध्यपूर्वेतील तणावाशी संबंधित आहे. त्यांच्या मते भविष्यात United States, Israel आणि Iran यांच्यात गंभीर लष्करी संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील दीर्घकालीन राजकीय मतभेद, सामरिक स्पर्धा आणि प्रादेशिक संघर्ष लक्षात घेतले तर ही शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. मात्र सर्वाधिक चर्चेचे ठरलेले तिसरे भाकित म्हणजे या संभाव्य युद्धाचा कालावधी. प्रा. जियांग यांच्या मते जर इराण-अमेरिका-इस्त्रायल यांच्यात युद्ध झाले, तर ते अल्पकालीन राहणार नाही. उलट हा संघर्ष दीर्घकाळ चालू शकतो आणि त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होऊ शकतात. इराणचे भौगोलिक स्थान, पर्वतीय प्रदेश, मोठी लोकसंख्या आणि दीर्घकालीन युद्धासाठी असलेली तयारी यामुळे हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा ठरू शकतो. इतिहास साक्ष देतो की महासत्तांना दूरवरच्या प्रदेशात दीर्घकालीन युद्ध करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा युद्धांमुळे आर्थिक ताण वाढतो, आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण होतो आणि देशांतर्गत राजकारणावरही परिणाम होतो. परिणामी अनेकदा महासत्तांनाही आपली धोरणे बदलावी लागतात. जर असा संघर्ष प्रत्यक्षात घडला, तर त्याचे परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरते मर्यादित राहणार नाहीत. जागतिक अर्थव्यवस्था, तेलबाजार, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि जागतिक शक्तिसंतुलन यावर त्याचा दूरगामी परिणाम होऊ शकतो. काही तज्ज्ञांच्या मते अशा संघर्षांमुळे जगातील शक्तिसंतुलन बदलून नव्या जागतिक व्यवस्थेचा उदय होण्याची शक्यता आहे. आजच्या परिस्थितीत जगाला संघर्ष नव्हे तर संवाद आणि सहकार्याची आवश्यकता आहे. इतिहासाचे धडे सांगतात की युद्धे समस्या सोडवत नाहीत; उलट नवीन संकटे निर्माण करतात. त्यामुळे जागतिक शक्तींनी संयम, दूरदृष्टी आणि शांततेचा मार्ग स्वीकारणे हेच मानवजातीच्या भविष्यासाठी हितावह ठरेल. ■ ■

डॉ. केशव पाटील
मो.9890171364

# विश्वगुरु कोण आणि ते विश्व केवढे?

**ब्राम्हण विश्व गुरु आहे ही बाब मनुस्मृतीच्या दुसऱ्या प्रकरणात आहे. मनुस्मृतीची उत्पत्ती ही इसवी सनाच्या 200 वर्षे पूर्वी आणि 200 वर्षे नंतरची आहे असे सांगितले जाते. म्हणजे तिच्या निर्मितीचा काळ हा असा 400 वर्षांचा सांगितला जातो. हेही एक गूढच म्हणता येईल. दुसरे म्हणजे मनुस्मृती कुठे लिहिली गेली याचे स्पष्ट उत्तर नाही.**

बहुजन मानस





नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
९९७०८७३५६०

काही म्हणतात आज पंजाब प्रांतांच्या भागातील आहे. अर्थात, त्या वेळी पंजाब प्रांतही नव्हता. म्हणजे मनुचे विश्व छोटासा भाग होता. त्या भागाला तो विश्व समजत होता. ती भूमिका आज मनुवादी संघ आजच्या जगाला लावतात. यातील खोटेपणा स्पष्ट आहे. काही लोक मोदींना विश्व गुरु म्हणतात. अर्थात त्यांना मनुस्मृतीत काय आहे ते मालूम नसते.

**मनू म्हणतो, 'एतद्देश प्रसूतस्य सकाशाद्यजन्मः ।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरपृथिव्यां सर्व मानवाः 2-19**

जगातील सर्व लोकांनी या देशातील उच्च कुलीन ब्राम्हणांकडून शिकले पाहिजे. सर्वांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले पाहिजे. हा मनुस्मृतीतील श्लोक गोळवलकरांनी आपल्या' वि ऑर अवर नेशनहूड डिफाईन्ड या पुस्तकात दिला आहे. ते म्हणतात, जगातील पहिला आणि श्रेष्ठ संविधान देणारा जर कोणी असेल तर तो मनू आहे. आपले कर्तव्य समजून घेण्यासाठी किंवा शिकण्यासाठी या देशातील जन्माने सर्वश्रेष्ठ असलेल्या ब्राम्हणांच्या पायाशी शरण आले पाहिजे. (पृ.5556) 5 ऑगस्ट 2020 ला अयोध्या येथील राममंदिर भूमिपूजनाच्या वेळी रा. स्व. संघ प्रमुख मोहन भागवत यांनी अगदी तोच मनुस्मृतीतील श्लोक उद्धृत केला की, 'ब्राम्हण सर्वश्रेष्ठ आहे आणि तेच जगाचे मार्गदर्शक आहेत.' हाच छुपा अजेंडा त्यांच्या विचारात आणि वर्तनात वारंवार झळकतो. रा. स्व. संघाची विचारधारा आणि इतर संघटनांची विचारधारा यात फरक आहे? बरेच जण हा फरक लक्षात न घेता रा. स्व. संघावर टीका करतात. रा. स्व. संघ विचारांची पाळेमुळे या देशातील मानवतावादी, सभ्य, मूलनिवासी समूहांचा आर्यांनी पाडाव करून ताबा घेतल्याच्या घटनेत सापडते. त्या विजयाने ते वरचढ ठरले. हा वरचढपणा टिकवून ठेवण्यासाठी अनेक छद्मी डावपेचांचा वापर करीत राहिले. (सत्यशोधकी विचारांच्या लोकांवर ब्राम्हणद्वेषाचा आरोप करणे, हा मूळनिवासी भोळ्या जनतेला भूल देण्याचा, फूट पाडण्याचा डाव आहे.) त्या डावपेचाचाच भाग म्हणून त्यांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था निर्माण केली.

सत्ताधीश किंवा राजा बनविण्याची कल्पना विकसित झाली; परंतु सत्ताधीश किंवा राजाने ब्राम्हण जातीवर शासन करणे ब्राम्हणांना आवडले नाही. त्याचा ब्राम्हण वर्गाने एकसंघपणे विरोध केला. चातुवर्णचा उगम यात आढळतो. राजासुद्धा ब्राम्हणांपेक्षा दुय्यम आहे, या कल्पनेतून चातुवर्णाची निर्मिती झाली. ज्या विचारकांनी चातुवर्णात लोकांना विभक्त करणारे मॉडेल बनविले, त्यांनीच राजा किंवा सत्ताधीश अधिकाधिक मूर्ख राहील आणि ब्राम्हणी नियम, मूल्यानुसार राज्यशासन चालवतील, ही खुणगाठ पक्की केली. उदा. रामायणातील राम. तो ब्राम्हणांच्या अधीन असल्याचे दाखविले. याचा अर्थ राजा हा ब्राम्हणांच्या खाली आहे. ही त्यांची विचारधारा, ते आजही त्याचा पाठपुरावा करताना दिसतात. अलीकडचे छत्रपती शिवाजींच उदाहरण पाहिले तरी ते तसाच विचार करताना दिसतात. ब्राम्हण गुरू रामदासांनी शिवाजी घडविल्याची मांडणी वारंवार केली जाते. शिवरायांच्या जातीतील लोकांनी कितीही खंडन केले तरी ते आपली भूमिका सोडत नाही. आपल्या म्हणण्यावर ठाम राहतात. देव जगभरातील बहुतांश लोक स्वतःच्या देवदताचे अनुयायी प्रेषित समजतात. इस्लाममध्ये पैगंबर आणि ख्रिश्चनमध्ये येशु या धर्मातील लोक देव दुय्यम असल्याचा दावा करत नाही परतु ब्राम्हण आताच नाही पूर्वीदेखील राजा त्याच्या खाली असल्याचे समजत आले. वाल्मिकी रामायणात राम ब्राम्हणाचा पूजक असल्याचे वर्णन केले आहे, जो ब्राम्हणांच्या इच्छेप्रमाणे वागतो. (बालकांड आणि अयोध्याकांड, रामायण)मनुस्मृतीमध्येही राजाने ब्राम्हणांच्या आज्ञा पाळव्या असे सांगितले आहे. आताच्या काळात रा. स्व. संघ त्याच विचारधारेचे प्रारूप आहे. एवढेच नाही तर शासन प्रशासनात देखील याचे अनुकरण केले गेले. शासकांकडून ब्राम्हणांना इतरांपेक्षा नेहमीच सुपेरिअर वागणूक मिळाली. वर्णव्यवस्थेतील वर्णक्रमानुसार राजाने वरच्या वर्णाच्या गरजांकडे प्राधान्यक्रमाने लक्ष दिले पाहिजे, असे मनुस्मृतीने लिहिले आहे, म्हणजेच राजाने ब्राम्हणांकडे प्रथम लक्ष दिले पाहिजे. ब्राम्हणेतरांच्या पक्ष सत्तेत असला तरी हीच परंपरा आजही पाळली जाते. अपवाद असू शकतो. (तमिळनाडू) (डीएमके) गोळवलकरांनी त्यांच्या 'बंच ऑफ थॉट' या पुस्तकात सांगितले की, महान व्यक्ती हे आमचे मार्गदाते नाही. आमचे मार्गदर्शक, आमचे ध्येय आहे. कोणतेही महान व्यक्तिमत्त्व संघासाठी आदर्श नाही. राष्ट्राच्या शाश्वत जीवनाच्या तुलनेत एखाद्या महान व्यक्तीचे जीवन शुल्लक ठरते. शेकडो वर्षांच्या राष्ट्राच्या विकासात महान व्यक्तीचे महत्व फारच छोटे असते. संपूर्ण विश्वात आमचा केवळ एकमेव असा धर्म आहे की, जो कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तिमत्व किंवा त्याच्या विचारांच्या आधारावर अवलंबून नाही. पुढे ते सांगतात की, आमची विचारप्रक्रिया एखाद्या ग्रंथावर देखील आधारलेली नाही. तसे असते तर एकाच पुस्तकाला धर्मग्रंथ मानणाऱ्या मुस्लिम, ख्रिश्चन धमपिक्षा आम्ही सरस ठरणार नाही. (विचार नवनीत, हिंदी आवृत्ती, बंच ऑफ थॉट - मा. स. गोळवलकर लोकहित प्रकाशन, लखनौ) (5.1979) रा. स्व. संघ नेता दीनदयाल उपाध्याय म्हणतात, देव काहीही करू शकतो; परंतु धर्मविरोधी कृती करू शकत नाही. गैरसमज होण्याचा धोका पत्करून सांगतो, धर्मदेवापेक्षाही मोठा आहे. (Hindu Nationalism & Cristophe Jaffrelot 153, 2007) म्हणजेच ब्राम्हणांनी देवाला त्यांची गरज म्हणून निवडले. ■ ■

# अनुसूचित जातींना विभागून फुले-आंबेडकरी विचार आणि चळवळ कमकुवत करण्यासाठी उपवर्गीकरणाचा डाव

**अनुसूचित जातींसाठीचे आरक्षण हे कधीही गरिबी निर्मूलन उपाय म्हणून योजले नव्हते. तो गरिबांमधील गरिबांना दिलेला तात्पुरता सवलतीचा भाग नव्हता. ती गतिशीलता लाभल्यानंतरही टिकून राहणाऱ्या सामाजिक अधोगतीच्या खोलवर रुजलेल्या व्यवस्थेला दिलेली घटनात्मक प्रतिक्रिया होती.अनुसूचित जातींच्या चौकटीत 'क्रीमी लेअर'चा तर्क आणणे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोनाचे आधुनिकीकरण करणे नव्हे, तर तो चुकीच्या पद्धतीने समजून घेणे आहे.**




न्यायमूर्ती बेला त्रिवेदींचे असहमतीचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या सर्वात जवळ आहे. या निराशाजनक घटनात्मक काळात, दविंदर सिंग प्रकरणातील न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांचे एकमेव असहमतीचे मत (Dissent) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ आराखड्याचा सर्वात गंभीर न्यायिक बचाव म्हणून उठून दिसते. त्यांनी हे ओळखले की अनुच्छेद 341 हे केवळ साधे प्रशासकीय वेळापत्रक नसून ती एक स्वयंपूर्ण घटनात्मक संहिता (Constitutional Code) आहे. चांगल्या वितरणाच्या बहाण्याने, जे काम राज्य प्रत्यक्षरित्या करू शकत नाही, ते अप्रत्यक्षरित्या करण्याची परवानगी राज्याला दिली जाऊ शकत नाही, हे त्यांनी ओळखले. अनुसूचित जाती हा एकचघटनात्मक वर्ग आहे आणि अनुच्छेद 341 च्या तर्काला बाधा न आणता राज्ये या वर्गाची अंतर्गत पुनर्रचना करू शकत नाहीत, यावर त्यांनी भर दिला. ते असहमतीचे मत महत्त्वाचे आहे. कारण ते ते पाहू शकते जे बहुमताने पाहण्यास नकार दिला आहे, घटनात्मक ओळख ही केवळ प्रशासकीय ओळख नसते. ते एक संरक्षण आहे. ती एक संरचना आहे. महाराष्ट्रामध्ये आता ज्या प्रकारच्या प्रादेशिक, राजकीय अभियांत्रिकीचा (Political Engineering) प्रस्ताव दिला जात आहे, त्याविरुद्ध ती एक ढाल आहे.न्या. त्रिवेदींच्या मताकडे जेवढे लक्ष द्यायला हवे होते तेवढे दिले गेले नाही, कारण ते मत त्या सत्याचे जतन करते जे सार्वजनिक चर्चेत सोयीस्करपणे विसरले गेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान केवळ फायदे देण्यासाठी नाही, तर विखंडन रोखण्यासाठी देखील तयार केले गेले होते. खरे उद्दिष्ट राजकीय आहे. दलित एकता मोडणे महाराष्ट्रातील वादाचा उगम इथेच शोधला पाहिजे. आरएसएस-भाजप गट जातीकडे ती नष्ट करण्याच्या उद्देशाने पाहत नाही. तो जातीकडे राजकीय व्यवस्थापन, आत्मसात करणे आणि पुनर्वापर करण्यासाठी एक सामाजिक वास्तव म्हणून पाहतो. त्यांचे चातुर्य सामाजिक क्रांतीमध्ये नाही, तर निवडणुकीच्या विभाजनामध्ये (Electoral Segmentation) आहे. एकसंघ आंबेडकरवादी जाणीव ही हिंदुत्ववादी राजकारणासाठी समस्या आहे, कारण ती आपल्यात ब्राह्मणवाद, जातीय उतरंड आणि हिंदू सामाजिक व्यवस्थेची संरचनात्मक समीक्षा घेऊन चालते. ती दडपशाहीला केवळ वैयक्तिक अनुभव म्हणून नव्हे, तर एक व्यवस्था म्हणून स्मरणात ठेवते. ती केवळ तक्रार नाही, तर एकजुट निर्माण करते. पोट-वर्गीकरण एका वेगळ्या राजकीय तर्काला खतपाणी घालते. ते एका दलित जातीला असे पटवून देण्याचे आमंत्रण देते की दुसऱ्या जातीने आरक्षण बळकावले आहे. ते प्रत्येक उप-समूहाला स्वतःकडे एका मोठ्या जातिविरोधी लढ्याचा भाग म्हणून नव्हे, तर शेजारील समुदायांविरुद्ध दावा मांडणारा दावेदार म्हणून पाहण्यास प्रवृत्त करते. ते एका सामायिक घटनात्मक ओळखीला राज्य-प्रमाणित न्यायाच्या तुकड्यांसाठीच्या स्पर्धेत रूपांतरित करते. हे सत्ताधारी पक्षांसाठी राजकीयदृष्ट्या उपयुक्त आहे कारण ते व्यापक दलित अस्मितेला कमकुवत करते आणि त्याऐवजी राजाश्रयावर अवलंबून असलेले लहान गट तयार करते. महाराष्ट्रात, जिथे आंबेडकरवादी राजकारणाने विशेषतः प्रभावीपणे दलित जाणीव घडवली आहे, तिथे असे विखंडन अत्यंत विनाशकारी ठरेल. ही केवळ आणखी एक प्रशासकीय सुधारणा नाही. हा एका कष्टसाध्य राजकीय वारशावर झालेला हल्ला आहे. अनुसूचित जातींच्या विभाजनासाठी काँग्रेस आरएसएस/भाजप इतकीच दोषी आहे. जर भाजप आणि आरएसएस दलित एकता खंडित करण्यासाठी पोट-वर्गीकरणाचा वापर करत असतील, तर काँग्रेस आपण तत्त्वाच्या बाजूने असल्याचा दावा करू शकत नाही. तिचा इतिहास ढोंगीपणाने माखलेला आहे. पंजाबमध्ये अनुसूचित जातींच्या पोट-वर्गीकरणाची पहिली मोठी हालचाल भाजपने नाही, तर 1970 च्या दशकात काँग्रेस सरकारने केली होती. त्यानंतर हरियाणानेही तसेच केले. त्यामुळे काँग्रेस दशकांपासून या राजकारणाचा भाग राहिली आहे. ज्या प्रक्रियेला तिनेच सामान्य बनवण्यास मदत केली, त्यावर ती आता धक्का बसल्याचे नाटक करू शकत नाही. दविंदर सिंग निकालानंतर हा ढोंगीपणा अधिक निर्लज्ज झाला आहे. 2024 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एकदाचे द्वार उघडल्यानंतर, अनुसूचित जातींचे पोट-वर्गीकरण लागू करणारे तेलंगणा हे भारतातील पहिले राज्य ठरले, जेथे काँग्रेसचे सरकार आहे. त्यानंतर काँग्रेसशासित कर्नाटकनेही त्याच दिशेने पावले उचलली. त्यामुळे राहुल गांधी ज्या संविधानाचे रक्षण करण्याचा दावा करतात, त्या संविधानाच्या संरचनात्मक तर्काविरुद्ध त्यांचे पक्ष सत्तेत असताना कृती करत असतील, तर ते घटनात्मक नैतिकतेची भाषा करू शकत नाहीत. हा काँग्रेसचा नमुना आहे. भाषणांमध्ये आंबेडकरांचे आवाहन करायचे, धोरणांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सौम्य (Dilute) करायचे; विरोधात असताना संविधानवादाचा अभिनय करायचे आणि सत्तेत आल्यावर त्याचा त्याग करायचे. राहुल गांधींना संविधानाची शिस्त न पाळता त्याची नैतिक प्रतिष्ठा हवी आहे. त्यांना भाजपच्या सामाजिक अभियांत्रिकीवर टीका करायची आहे, पण काँग्रेस सत्तेत असताना त्याच साधनांचा शांतपणे फायदा करून घ्यायचा आहे. हे तत्त्व नाही. ही राजकीय नौटंकी आहे. महाराष्ट्राने हा मार्ग नाकारला पाहिजे. जर चिंता ही असेल की अनुसूचित जातींमधील काही घटकांचे प्रतिनिधित्व अजूनही अपुरे आहे, तर त्याचे उत्तर त्या प्रवर्गाचेच तुकडे करणे हे नाही. राज्य सरकार शिष्यवृत्ती, वसतिगृहे, शैक्षणिक मदत, विशेष भरती मोहिमा, प्रशिक्षण व्यवस्था, संस्थात्मक प्रवेश आणि इतर लक्षित हस्तक्षेप वाढवू शकते. ते अडथळे ओळखून अंमलबजावणीतील त्रुटी दूर करू शकते. ते पहिल्या पिढीतील शिकणाऱ्यांना आणि ऐतिहासिकदृष्ट्या दुर्लक्षित समुदायांना अनुसूचित जातींच्या घटनात्मक एकतेला धक्का न लावता मदत करू शकते. परंतु एकदा का राज्याने अंतर्गत फाळणीचे तत्त्व स्विकारले की, ते दलित न्यायाचा अर्थच बदलून टाकते. ते शोषितांना सांगते की त्यांच्या प्रगतीचा मार्ग जातीविरुद्धच्या एकजुटीत नसून जातींतर्गत स्पर्धेत आहे. ते या विचाराला वैधता देते की राज्य त्यांचे तुकडे करून त्यांच्यावर राज्य करू शकते. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनात्मक संकल्पनेच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. या प्रतारणेला वैधता देणारे राज्य महाराष्ट्र बनू नये. महाराष्ट्राने हे लक्षात ठेवले पाहिजे की अनुच्छेद 341 हा प्रत्येक नवीन व्होट बँक शोधणाऱ्या सरकारद्वारे बदलला जाणारा एखादा लवचिक कल्याणकारी फॉर्म्यूला म्हणून तयार केला नव्हता. तो अशा प्रकारच्या हाताळणीविरुद्ध (Manipulation) एक संरक्षणात्मक घटनात्मक भिंत म्हणून उभारला गेला होता. त्यामुळे महाराष्ट्रासमोरची निवड स्पष्ट आहे. महाराष्ट्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आराखड्यासोबत, घटनात्मक एकता, संरचनात्मक संरक्षण आणि दलित एकजुटीसोबत उभा राहू शकतो. किंवा, तो न्यायाच्या नावाखाली शोषितांना हाताळण्यायोग्य तुकड्यांमध्ये विभागण्याची तयारी करणाऱ्यांसोबत उभा राहू शकतो. महाराष्ट्राने शहाणपणाने निवड केली पाहिजे. ■ ■



जयंत एस. रामटेके
मो. 97736 90698

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १०७



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मानोरा ता. भिवापूर, जिल्हा. नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे अनावरण राजाभाऊ खोब्रागडे यांनी दि. 21/04/1975रोजी केले. बाजूला बौद्ध विहार असून येथे चळवळीचे प्रेरणास्थान आहे.

संवाद मित्र, मुकुंद मेश्राम. मो. 9923522083

# दुबईत कांशीराम यांच्या 92 व्या जयंतीनिमित्त प्रबोधनसत्र

**दुबई, UAE:** बहुजन चळवळीचे शिल्पकार कांशीराम यांच्या 92 व्या जयंतीनिमित्त ग्लोबल बामसेफ डायस्पोरा (GBD) च्या UAE व गल्फ रीजन शाखेतर्फे दुबई येथे विशेष प्रबोधन सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात साहेबांच्या प्रसिद्ध घोषवाक्याने 'जितकी ज्याची संख्या भारी, त्याची तितकी हिस्सेदारी' केली. या सत्रात उपस्थित वक्त्यांनी कांशीराम यांच्या जीवनकार्यावर, संघर्षावर आणि बहुजन समाजासाठी त्यांनी उभारलेल्या चळवळीवर सखोल प्रकाश टाकला. आशीष जीवन यांनी कांशीराम यांच्या सोबतचे अनुभव सांगताना, बहुजन समाजाला सत्तेच्या केंद्रस्थानी नेण्याचे त्यांचे ध्येय आणि त्यातील यश अधोरेखित केले. अरिहंत यांनी



साहेबांची सैनिकी पार्श्वभूमी आणि त्यांच्या निडर, ठाम व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख करत, त्यांच्या विचारांची ताकद स्पष्ट केली. प्रशांत भेले यांनी सांगितले की, 'राजकारण चालो वा न चालो, सामाजिक परिवर्तनाचा प्रवास कायम सुरू राहिला पाहिजे,'हा त्यांचा ठाम विचार होता. कुमार संजय यांनी संघटनशक्तीवर भर देत, विखुरलेल्या समाजाला एकत्र आणण्यात साहेबांनी बजावलेली भूमिका विशद केली. भानू प्रताप उजाला यांनी माध्यमांच्या महत्त्वावर भाष्य करत, बहुजन समाजासाठी स्वतंत्र आणि प्रभावी मीडिया उभारण्याचे साहेबांचे स्वप्न अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अरिहंत पाथर्डे, राजेश मेश्राम, मनोहर जयपाल, भूपेंद्र, शुभम बराहते, व्यंकटेश, नवीन वर्मा, अजय, अरविंद, राम आशीष, भानू प्रताप उजाला, लक्ष्मी नारायण, सचिन रामटेके, आशीष जीवन, प्रशांत भेले आणि मंदार मालपावर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले. या प्रबोधन सत्राच्या माध्यमातून बहुजन समाजातील बांधवांना 'Pay Back to Society' या तत्त्वानुसार कार्य करण्याचे आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

# मंगळवारी रहाटे कॉलनी ते दीक्षाभूमीवर पंचशील धम्म ध्वज यात्रा




**नागपूर :** दीक्षाभूमी दक्षता समितीच्या वतीने पत्रकार भवन येथे पत्रपरिषद घेण्यात आली. त्यावेळी किशोर गेडाम आणि माया उके यांनी सांगितले की, सम्राट अशोक जयंती निमित्ताने 125 फूट ध्वज हातात घेऊन पंचशील धम्म ध्वज यात्रेचे आयोजन मंगळवारी 24 मार्च रोजी करण्याचे आयोजिले आहे. चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या 2023 व्या जयंती प्रीत्यर्थ दीक्षाभूमी दक्षता समिती सम्राट अशोक सेना अखिल भारतीय समता सैनिक दलाच्या संयुक्त विद्यमाने धम्मदीप यात्रेचे आयोजन करण्यात आले असून धम्मदीप यात्रेचा मार्ग राहटे कॉलनीतील मेट्रो स्टेशन ते दीक्षाभूमी असा राहणार आहे धम्मदीप यात्रेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भंते आर्य नागार्जुन सुरई ससाई पंचशील ध्वज दाखवून शुभारंभ करणार आहेत. दीक्षाभूमी मध्ये पंचशील धम्म ध्वज यात्रेचा प्रवेश झाल्यानंतर दीक्षाभूमीवर सम्राट अशोक यांचा पूर्ण आकृती पुतळ्याला माल्यार्पण करून त्रिशरण पंचशील घेण्यात येईल. सम्राट अशोक यांच्या जयंती प्रीत्यर्थ काढण्यात येणाऱ्या पंचशील ध्वज यात्रेला यशस्वी करण्यासाठी नागपूर शहर व नागपूर ग्रामीणच्या सगळ्या बौद्ध विहाराच्या कमिटी उपासक - उपासिका उपस्थित राहणार आहे. पंचशील ध्वज यात्रा काढून प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती यशस्वीरित्या साजरी करण्यासाठी दीक्षाभूमी दक्षता समितीचे अध्यक्ष माया उके, अभिषेक फुलकर, आशिष बनसोड, किशोर गेडाम, गंगा टेंभुर्णे, माला अंबुलकर, रत्नाकर खोब्रागडे, वैशाली डबरासे, राजेंद्र बोबडे, कविता लांडगे, किरण गौरखेडे, वर्षा वालदे, माधुरी बनसोड, पूर्णिमा शेंडे, शिवानी शेंडे, इत्यादी परिश्रम घेत आहे. अशी माहिती पत्रपरिषदेमध्ये किशोर गेडाम आणि माया उके यांनी दिली.

## महत्वाचे

### डॉ. ऋतुजा गोमासे यांना नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक



**नागपूर :** अखिल भारतीय सावित्री ब्रिगेड आणि थिऑसॉफिकल ऑर्डर ऑफ सर्विस द्वारा आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त स्त्री शक्ती जागृती मेळाव्यात नृत्य स्पर्धेत डॉ. ऋतुजा आणि रिजुल गोमासे, आई व मुलगी यांनी केलेल्या नृत्याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. अध्यक्ष डॉ. स्मिता मेहेत्रे यांच्या हस्ते ट्रॉफी सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या यशाबद्दल प्रणोती कळमकर, डॉ. शील बागडे, रेखा हिरडकर, सुवर्णा सूरकर, छाया महाले, विभावरी बांडबूचे, डॉ. रितेश यांनी शुभेच्छा दिल्यात.

### नंदा कोल्हटकर यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार



**नागपूर :** ज्येष्ठ समाजसेविका नंदा कोल्हटकर यांना महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत 2023 - 24 चा ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार वितरण सोहळा नाथी दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ चर्चगेट मुंबईत आयोजित केलेल्या कार्यक्रमात एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या पाटकर दीक्षांत सभागृहात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. स्त्री शिक्षण सामाजिक समता आणि महिला सबलीकरण आणि सक्षमता क्षेत्रात निरलस कार्य करणाऱ्या संपूर्ण महाराष्ट्रातून 11 महिलांचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला होता. पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत दादा पाटील (मंत्री उच्च व तंत्र शिक्षण) मुख्य अतिथी छगन भुजबळ (मंत्री अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण) तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रमुख सचिव गोपाल रेड्डी आणि एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले तर संचालक डॉ. अर्चना बोराडे यांनी तर डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम झाला.

### आंबेडकराईटस बुद्धिस्ट सोसायटी अलाइंस मोमेंटद्वारा चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त परिसंवाद

**संवाद मित्र प्रकाश बावनगडे, नागपूर :** महाड चवदार तळे सत्याग्रह दिन येथील नामांतर शहिद स्मारक 10नं. पुल, इंदोरा नागपूर या ठिकाणी आंबेडकराइटस बुद्धिस्ट सोसायटी अलाइंस मोमेंटद्वारा चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त परिसंवाद घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शुभम दाहाट हे होते. प्रमुख अतिथी दिनेश अंडरसहारे, शेखर सांगोळकर, अर्चना डोंगरे या होत्या. कार्यक्रमाच्या सुरवातीला राजीव अंबादे प्रास्ताविक मांडले त्यानंतर अतिथिंनी आपले विचार मांडले. अध्यक्ष शुभम दाहाट म्हणाले की महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह आंदोलन 20 मार्च हा दिवस भारतीय सामाजिक इतिहासातील क्रांतिकारी निर्णायक टप्पा ठरला आहे. कार्यक्रमाचे संचालन मोनिका जामगडे यांनी तर आभार राजू कापसे यांनी केले. कार्यक्रमाला अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

### महाड क्रांती दिन डॉ. बाबासाहेबांना बसपाचे अभिवादन



**नागपूर :** अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा नसलेला मानवी अधिकार प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह करून त्या अधिकारावर अंमल केला. त्याच्या 99 व्या स्मृति निमित्ताने बसपाच्या वतीने नागपुरच्या संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. बसपाचे महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, माजी प्रदेश सचिव महिला नेत्या रंजना ढोरे, तारा गौरखेड़े, जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, शहराध्यक्ष अनिकेत कुत्तरमारे, जिला सचिव अभिलेश वाहने, माजी नगरसेवक संजय जयसवाल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माल्यार्पण केले .बसपा नेते उत्तम शेवडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातील बहिष्कृत हितकारणी सभेने चवदार तळ्याचा सत्याग्रह करून त्या ठरावाची अंमलबजावणी केल्याची ऐतिहासिक माहिती दिली. संचालनअभिलेश वाहने यांनी तर समारोप शहराध्यक्ष अनिकेत कुत्तरमारे यांनी केला.

## नागपूर पदवीधर मतदारसंघाचे सुमेध बौद्ध गडपायले यांची उमेदवारी जाहीर

# युवा ग्रॅज्युएट फोरमचा एल्गार

**नागपूर :** 2020 मध्ये झालेल्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत संघटनेने दिलेला उमेदवार हा तिसऱ्या क्रमांकावर राहिला होता. अगदी त्याच जोश आणि त्याच उत्साहाने 2026 मध्ये होणाऱ्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी युवा ग्रॅज्युएट फोरमने आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्हेंशन सेंटरच्या नागार्जुन हॉल मध्ये आयोजित केलेल्या 'अधिकृत उमेदवारी घोषणा' या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या उत्साही जणसमुदाया समक्ष तरुण व सक्षम उमेदवार म्हणून सुमेध बौध्द गडपायले यांचे नावाची घोषणा केली. यावर्षी होणाऱ्या पदवीधर निवडणुकीत कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. सर्व प्रथम कार्यक्रमाच्या अध्यक्ष नंदा फुकट, प्रमुख अतिथी सचिन मेकाले यांचे हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात केली. उपस्थित मान्यवराचे स्वागत युवा ग्रॅज्युएट फोरम, नॉर्थ नागपूर सिनिअर सिटीझन फोरम, व नॉर्थ नागपूर महिला फोरम च्या सदस्यानी केले. प्रस्ताविक सिनेट मेंबर राहुल हनवते यांनी केले. पदवीधर निवडणुकीत मतदार नोंदणी व मतदान कसे करावे याबाबत सविस्तर माहिती सीए. विक्रम बोरकर यांनी दिली. युवा ग्रॅज्युएट फोरमने 'अधिकृत उमेदवारी घोषणा' कार्यक्रमात सुमेध बौध्द गडपायले यांची उमेदवार म्हणून




घोषणा केल्याबरोबर सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. धम्माच्या क्षेत्रात अनेक उपलब्धी त्यांच्या नावावर आहेत. विशेषतः आजच्या या 'अधिकृत उमेदवारी घोषणा' कार्यक्रमात भंडारा, गोंदिया, चंन्द्रपूर, वर्धा, गडचिरोली येथील प्रतिनिधी व नागपूर जिल्ह्यातील कामठी, काटोल, सावनेर, हिंगणघाट, मौदा, आर्वी, पुलगाव, तसेच दक्षिण, पश्चिम, नागपूर येथील प्रतिनिधी उपस्थित होते. प्रमुख अतिथी असलेल्या सचिन मेकाले यांनी आपल्या ओघवत्या वाणीने आणि शैलीने उपस्थित प्रेक्षकांना येणाऱ्या पदवीधर निवडणुकीत आपण किती जबाबदारीने वागले पाहिजे याबाबत अत्यंत पोटतिडकीने सांगितले. अश्विन बोरकर यांनी आता समस्त आंबेडकरी विचारधारेच्या पक्षाने एकत्रितपणे निर्णायक भूमिका घेऊन येत्या नागपूर पदवीधर निवडणुकीत युवा ग्रॅज्युएट फोरमच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर करावा अशी विनंती केली. संचालन पल्लवी आटे, रोहिणी दहिवले आभारप्रदर्शन अनिकेत माटे यांनी केले. या कार्यक्रमासाठी रोशन जांभुळकर, डॉ. शंभरकर, अशोक बागडे, आशिष सनकाळे, योगेश राऊत, श्रूतिका, आरती हनवते, प्रतिभा लोणारे, सोनु बहादे, विवेक गायकवाड, शमा मनवर, रंजना सुरजुसे, प्रशांत तांबे, नरेश साखरे, अनिरुद्ध बोदेले, शाम संनकाळे, रमेश गायकवाड, लक्ष्मीकांत कठाणे, निमजे, सुनील वाकोडे, सागर मुनेश्वर, वैशाली गोस्वामी, श्रीधर मंडपे, अजय गौतम, उषा उके, नंदिनी गौतम, बबीता सत्ते, नम्रता मोटघरे, लेखा बोरकर, राजश्री रामटेके, दक्षिता रामटेके, धम्मानंद मनवर, श्वेता रंगारी, विक्की पानतावणे, शैलेश खोब्रागडे, लिबर्टी क्लासेसचे विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.

# आज सत्यशोधक भाऊसाहेब या विषयावर व्याख्यान

**नागपूर :** सत्यशोधक समाज, नवउन्मेशन साहित्य सभा नागपूर, विद्रोही सांस्कृतिक चळवळ नागपूर द्वारा आयोजित मा. भाऊ मदनकर स्मृतीप्रित्यर्थ दिनांक 23 मार्च 2026 ला सायंकाळी 5.30 वाजता व्याख्यान आयोजित केलेले आहे. सत्यशोधक भाऊसाहेब उर्फ डॉ. पंजाबराव देशमुख या विषयावर सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक डॉ. अशोक चोपडे यांचे व्याख्यान राहणार आहे. 'गांधी का मरत नाही' या बहुचर्चित पुस्तकाचे लेखक, शेतकरी नेते, जनवादी पत्रकार चंद्रकांत वानखडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष राहणार आहे. 'अर्पण हॉल', पहिला माळा, मोर हिंदी भवन, रानी झांसी चौक सिताबर्डी नागपूर या मध्यवर्ती ठिकाणी आयोजित केलेले आहे. संत विचार चळवळ, भाऊ मदनकर स्मृती व्याख्यान आयोजन समिती, इवा वल्ड टूर्स, नागपूर आणि समविचारी संघटना यांच्या सहभागाने आयोजित केलेल्या महत्त्वपूर्ण विषयांवरील व्याख्यानाला विविध सत्यशोधक पुरोगामी ओबीसी, बहुजन चळवळीतील तसेच नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने विजय बाभुळकर, मिरा मदनकर, समिक्षा गणेशे, सुधा बामनपल्लीवार, बाबा बीडकर, टेमराज माले, संजय नरखेडकर, अनुज हुलके, विनोद उलिपवार, विनोद खोबरे, गोविंद वरवाडे, राजु बोचरे , रंजना कोल्हे, रमेश सोनवणे, नरेंद्र सहस्त्रबुद्धे, सुरेश मानमोडे, कर्णबोधी मांडले, दिगांबर जिचकार, हेमराज बनसिंगे, श्रीरंग मदनकर यांनी केलेले आहे.

# जाफर नगर ईदगाह मैदानावर मुस्लिम समुदायाने ईदची नमाज अदा

**नागपूर :** प्रिय श्रोतेहो, मुस्लिम समाज सध्या मोठ्या अडचणींचा सामना करत आहे. या वेळी पवित्र कुराण आणि पैगंबर हजरत मुहम्मद साहिब यांचे चरित्र वाचणे आणि ते आपल्या व्यावहारिक जीवनात अमलात आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे, तरच परिस्थिती निश्चितपणे बदलू आणि सुधारू शकते. निरर्थक चर्चांमध्ये गुंतण्याऐवजी, आपण पवित्र कुराण आणि आपले प्रिय पैगंबर मुहम्मद मुस्तफा (त्यांच्यावर शांती असो) यांच्या निर्देशांचे पालन केले पाहिजे. अल्लाह आपल्याला या द्विधा मनस्थितीतून बाहेर काढून अधिक उंचीवर नेऊ शकतो. जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि विस्तार व स्थिरीकरण विभागाचे केंद्रीय संचालक रिझवानुर रहमान खान यांनी ईद-उल-फित्रच्या निमित्ताने हे विचार व्यक्त केले. तो म्हणाला की, या द्वेषाच्या पुरात आपलाही वाटा आहे, त्यामुळे आपण शुभ आणि उदात्त कर्मे केली पाहिजेत. आम्ही रमजान महिन्यात कुराण वाचले आणि त्याचा अभ्यास केला आहे. ते आपल्या जीवनात, आपल्या व्यवसायात, आपल्या दैनंदिन घरकामात, आपल्या मुली, माता, पत्नी आणि मुलांच्या जीवनात, आपल्या लहान मुलांच्या जीवनात आणि आपल्या सण-उत्सव, मेळावे, विधी आणि लग्नसमारंभांमध्ये दिसले पाहिजे. तो म्हणाला की आपण आपल्या श्रद्धेवर ठाम राहिले पाहिजे. कोणत्याही संकटामुळे आपण खचून जाऊ नये. चिकाटी हे मानवी जीवनाचे आणि श्रद्धावानाच्या जीवनाचे भूषण आहे. सध्याच्या ज्वलंत मुद्द्यावर ते म्हणाले की, अमेरिका आणि इस्त्रायलने कोणत्याही हेतूशिवाय इराणविरुद्ध युद्ध पुकारून



अन्याय आणि क्रुरता दाखवली आहे. परिणामी, त्याचे दुष्परिणाम आणि समस्या जगभर दिसून येतात. जमात-ए-इस्लामी हिंदचे नागपूर शहर अध्यक्ष डॉ. ख्वाजा इझार अहमद यांनी 'फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्स' चे एसआयआर-आधारित आवाहन वाचून दाखवले आणि सांगितले की, महाराष्ट्रात ही प्रक्रिया आधीच सुरू झाली आहे. जाफर नगर जामा मशिदीचे इमाम रहमतुल्ला साहिब यांनी ईदच्या नमाजचे नेतृत्व केले. त्यांनी शांतता, सलोखा, जातीय सलोखा, कल्याण आणि रोगमुक्तीसाठी प्रार्थना केली आणि प्रवचन दिले. गिट्टीखाना पोलीस स्टेशनचे आदरणीय पोलीस निरीक्षक विजय दिघे साहिब आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य उत्तमरीत्या पार पाडले.'नौजवाने जाफर नगर तझीम' चे अध्यक्ष मुहम्मद शाहिद आणि सदस्य हारून नूरानी, रुबेल, इक्बाल बारी, इम्रान अली, इक्बाल सिद्दिकी, इम्रान अली आणि वकील अन्वर यांनी ईदगाह मैदानावर ईदच्या नमाजाची सर्व तयारी पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली. ही माहिती जेआयएचचे माध्यम सचिव डॉ. एम.ए. रशीद यांनी दिली.

# संविधान परिवाराच्यावतीने महाडच्या संगराचे शताब्दी वर्ष सुरु

**नागपूर :** संविधान परिवाराच्यावतीने परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा जाटतरोडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना व कृतज्ञता व्यक्त करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. पँथर सुरेश घाटे होते. तसेच प्रमुख अतिथी प्रवीण कांबळे मुख्य संयोजक निळाईचे होते. या कार्यक्रमाला प्रा. रमेश पिसे, कामगार नेते अरुण गाडे, संविधान जागरचे डॉ. माधवराव जांभुळे इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालक संविधान परिवाराचे मुख्य संयोजक प्रा. राहुल मून यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रवीण कांबळे यांनी आपल्या मुख्य भाषणात असे म्हणाले की महाड क्रांतिदिन हा स्त्रियांच्या जीवनात बदल घडवणारा होता. स्त्रियांच्या पेहरावात इथे बदल करण्यात आला. टोंगळ्यापर्यंत लुगडी घालणाऱ्या स्त्रियांना व्यवस्थित कपडे घाला असे आव्हान त्यावेळी केले यावेळी लक्ष्मीबाई टिपणीस इंदिराबाई चित्रे या महिलांनी साडी घालून देण्यास सहकार्य केले अस्पृश्य महिलांनी पेहराव चांगला घालावा आणि तो आज आहे हे महाडच्या क्रांतीचे यश आहे. महाडच्या संगरासाठी जी जमीन फते खा यांनी



दिली. तो तो पूर्वाश्रमीचा अस्पृश्य महार होता. त्यांनी मुसलमान धर्म स्वीकारला होता. परंतु त्यावेळी आपण मूळ कोण आहोत याची जाणीव झाली. त्यामुळे प्रचंड ब्राह्मणी विरोध असताना न डगमगता आपली जमीन महाक्रांती दिनाच्या आंदोलनाला दिली हा संघर्ष मानवी मूल्यासाठी होता असे प्रतिपादन प्रवीण कांबळे यांनी केले. डॉ. बाबासाहेबांचे ओबीसी समाजावर फार मोठे उपकार आहेत. त्यांनी प्रथमतः 340 मी कलम देऊन ओबीसी समाजाचा मुख्य प्रवाहात आणण्याचा काटोकाट प्रयत्न त्यांनी खंत व्यक्त केली की या देशांमध्ये कुत्र्या - मांजराची, गाईची, म्हशीची शिरगिणती होते. परंतु ओबीसी समाजाची गिनती होत नाही. तसेच कामगार नेते अरुण गाडे यांनी रिपब्लिकन समाज व कार्यकर्त्यांचा ऐक्य हे महत्त्वाचे असे सांगितले. डॉ. माधव जांभुळे यांनी सुद्धा महाड क्रांती दिनाच्या संदर्भात बरीच माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. सुरेश घाटे यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात असे सांगितले की जोपर्यंत रिपब्लिकन चळवळ राजकीय चळवळ मजबूत होत नाही तोपर्यंत आपल्याला भविष्य नाही आणि म्हणून एक त्याच्या दिशेने आपण प्रयत्न केले पाहिजे असे आवाहन केले. शेवटी आभार प्रदर्शन वैभव कांबळे यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. अशोक उरकुडे, सुरेश तामगाडगे, भाऊरावजी कोकणे, मच्छिंद्र सावळे, प्रदीप नारायणे, विनोद मेश्राम, राजेंद्र साठे, डॉ. मिलिंद उरकुडे, जितेंद्र जिभे, छोटू जनबंधू, रूपवंता वाघमारे, वंदना अंबादे, लता वाघमारे, मंगला खेडकर, आशा ओंकार, सुजाता उंबरे इत्यादी महिला पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

# समतेचा जागर वर्षभर सुरू राहणार : डॉ. हर्षदीप कांबळे

## चवदार तळे सत्याग्रह दिन बार्टीने प्रबोधनात्मक कार्यक्रम

**महाड :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी हक्क मिळवून देण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. तो लढा समतेसाठी, स्वाभिमानासाठी न्यायासाठी होता. या समतेच्या संगराला पुढील वर्षी शंभर वर्ष पूर्ण होणार आहेत. यानिमित्त वर्षभर सामाजिक न्याय विभागाच्यामार्फत समतेचा जागर सुरू राहणार, असल्याचे प्रतिपादन सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्यावतीने महाड येथील राष्ट्रीय स्मारकामध्ये बार्टीच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या लढ्यात सर्व जाती धर्मातील लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खंबीरपणे साथ दिली. चवदार तळ्याचा लढा हा मानव मुक्तीचा होता. चवदार तळ्यातील पाणी स्वच्छ करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने 55 कोटी रुपये मंजूर केले असून ते पाणी जल शुद्ध प्रकल्पाद्वारे शताब्दी पूर्वी पिण्यायोग्य होईल. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक न्याय खाते कटिबद्ध असून आपण सर्वांनी डॉ. बाबासाहेबाचा समतेचा लढा पुढे नेण्यासाठी आपण एकत्र येऊन पुढे नेऊया असे मत सामाजिक न्याय व



विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी बार्टी आयोजित चवदार तळे सत्याग्रह दिन अभिवादन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील सभागृहात चवदार तळे सत्याग्रह दिन अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिपा मुधोळ -मुंडे, डॉ. भारत कदम, सिद्धार्थ भंडारे, उपायुक्त भंडारे, लवटे, सुनिल जाधव, डॉ. सुचिता शिंदे, रविंद्र कदम, शुभांगी पाटील, डॉ. बबन जोगदंड, आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. कांबळे पुढे बोलताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी जो सत्याग्रह केला तो सत्याग्रह नुसता पाण्याचा नव्हता तर तो स्वाभिमानाचा होता. समाजात समता प्रस्थापित करण्याचा होता. आपल्या मुलांनी आपण यशस्वी होण्यासाठी मेहनत करा, अति मेहनत करा, कठोर मेहनत करा मेहनतीमुळेच आपण आपल्या जीवनात यशस्वी होतो. असा प्रेरक संदेश त्यांनी दिला. यावेळी डॉ. हर्षदीप कांबळे लिखित 'मी महाडचे चवदार तळे बोलतोय' ही अत्यंत प्रेरक अशी चित्रफीतही दाखवण्यात आली.

आभार व्यक्त करतांना दिपा मुधोळ -मुंडे यांनी समाजकल्याण व बार्टीच्या विविध योजनेचा समाजातील विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन उच्च शिक्षण घ्यावे, तसेच आपले भविष्य घडवावे असे आवाहन केले. क्रांतीस्तंभ येथील मुख्यमंचावर बार्टीच्यावतीने प्रसिद्ध गायक कुणाल वराळे, शाहीर शहिद खेडकर, हर्षद कांबळे यांनी पाऊले या क्रांतीच्या भीम गीतांच्या माध्यमातून 'चवदार तळ्याच्या संघर्षमय आठवणीला उजाळ दिला' महाड स्मारकात गायक अशोक गायकवाड यांनी 'रथ भीमाचा नेऊ पुढे' हा संगीतमय कार्यक्रम सादर केला. तसेच लेखक -दिगदर्शक- निर्माता राहुल जोंधळे लिखित 'निळी टोपी' व दर्शन महाजन निर्मित संविधानावर आधारित राष्ट्रग्रंथ हे दोन्ही 40 कलाकारांचा संच असलेले नाटके सादर केली. याप्रसंगी समाजकल्याण व बार्टीतील अधिकारी व कर्मचारी तसेच राज्यभरातून आलेले भीम अनुयायी, विविध क्षेत्रातील मान्यवर बार्टीचे समतादूत, तालुका समनव्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, डॉ. सारिका थोरात, महाड व्यवस्थापक प्रकाश जमदाडे, जनसंपर्क अधिकारी लीना कांबळे यांच्यासह बार्टीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. प्रास्ताविक व संचालन विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

## महाड सत्याग्रहाची शताब्दी

# सामाजिक न्यायाच्या पुनर्कल्पनेवर डॉ. आंबेडकर विचारधारा विभागमध्ये सखोल चिंतन

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात 'महाड सत्याग्रहाची शताब्दी - सामाजिक न्यायाची पुनर्कल्पना' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद उत्साहात पार पडला. परिसंवादात महाड सत्याग्रहाचे ऐतिहासिक, वैचारिक आणि समकालीन महत्त्व विविध मान्यवरांनी अधोरेखित केले. पहिल्या सत्रात डॉ. विकास जांभूळकर यांनी महाड सत्याग्रहाचे महत्त्व स्पष्ट करतांना सांगितले की, 1927 मधील हा लढा केवळ पाण्याच्या हक्कासाठी नव्हता, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय समतेचा पाया होता. या चळवळीचा प्रभाव भारतीय संविधानातील समानता, भेदभावास मनाई आणि अस्पृश्यतेचे उच्चाटन यांसारख्या तरतुदींमध्ये दिसून येतो, असे त्यांनी स्पष्ट केले. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या परिसंवादात अध्यक्षीय भाषण करताना विभागप्रमुख डॉ. अविनाश



फुलझेले यांनी सांगितले की, महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह हा केवळ पाण्यासाठी नव्हता, तर मानवी हक्क प्रस्थापित करण्याचा ऐतिहासिक प्रयत्न होता. दुसऱ्या सत्रात डॉ. विद्या चौरपागर यांनी 'महाड सत्याग्रहाची ऐतिहासिक व वैचारिक परिमाणे' या विषयावर विचार मांडले. डॉ. आंबेडकरांनी समाजात आत्मसन्मान, तर्कशुद्धता आणि आत्मविश्वास निर्माण केला, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन संगीता रामटेके यांनी केले, तर आभार प्रदर्शन अलका झारोंडे यांनी केले. तिसऱ्या सत्रात डॉ. अजय चौधरी यांनी सामाजिक न्याय, पाण्याचा हक्क आणि आंबेडकरवादी दृष्टिकोन यावर सविस्तर मांडणी केली. समारोपीय सत्रात डॉ. उमेश उदापुरे यांनी 'महाड सत्याग्रह ते आजचा भारत - धोरणे, कायदे व वास्तव' या विषयावर विचार मांडले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648